## डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापिठ, दापोली
## मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली
## रूखी विभाग

जा.क्र.मसंके/रूखी/ दरपत्रक/४९२/ /२०२३ दिनांक : 09 NOV 2023

# नोटिस

मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली अंतर्गत रूखी विभागामध्ये काजू बागांची साफसफाई करणे ही कामे करण्यासाठी ठेकेदारांकडुन दरपत्रक मागविण्यात येत आहेत. सदरची कामे दि.०१.१२.२०२३ ते दि.३१.१२.२०२३ या कालावधी मध्ये करावयाची असून त्याचा तपशिल खाली दिला आहे. त्यासाठी ठेकेदारानी एकूण कामाचे स्वरूपाची पाहणी करून आपली दरपत्रके दिनांक २३.११.२०२३ पर्यंत बंद लखोटयामध्ये निम्नस्वाक्षरी कराकडे सादर करावे याबाबतच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे...

- ठेकेदाराने ठेका सादर करण्यापूर्वी प्रत्येक्ष प्रक्षेत्रावर एकूण कामाचे स्वरूप पाहूण दरपत्रकामध्ये दर सादर करावेत.
- ठेका मंजूरी आदेश प्राप्त होताच मंजूर पत्रामध्ये दिलेल्या दिनांकापासून निम्नस्वाक्षरीकार/विभाग प्रमुख/प्रक्षेत्र अधिक्षक यांनी दिलेल्या सुचनांनुसार व त्यांचे देखरेखीखाली करावयाचे आहे.
- ठेकेदाराने नेमलेल्या मजूरांना श्रम व रोजगार मंत्रालय नवी दिल्ली यांचा एफ.नं.१/१३(१)२०१७-एल एस-११ दिनांक १७.०३.२०१७ च्या अनुषंगाने शासनाच्या किमान वेतन दरानुसार वेतन देण्यात येते, असे प्रमाणपत्र ठेकोदाराचे देयक कार्यालयास सादर करतेवेळी देयकासोबत सादर करणे आवश्यक आहे. प्रमाणपत्र देयकासोबत नसल्यास देयकाची अदायगी करण्यात येणार नाही.
- कामाची अदायगी महिना/काम पुर्ण झाल्यावर करण्यात येईल/ठेका संपल्यानंतर करण्यात येईल.संबंधीत देयक सादर करताना विभाग प्रमुख/प्रक्षेत्र प्रमुख/प्रक्षेत्र अधिक्षक यांचेकडील कामे वेळेत पूर्ण केलेबाबतचा दाखला देयकासोबत जोडणे बंधनकारक राहिल.
- ठेका अपूर्ण सोडल्यास ठेक्याच्या बीलाची अदायगी केली जाणार नाही व सदर कामाचा अनुभव पुढील ठेक्याच्यावेळी गृहीत धरला जाणार नाही.तसेच संबंधीत ठेकेदाराचे दरपत्रक/निविदा पुढील ठेक्याच्यावेळी ग्राहय धरले जाणार नाही.
- प्रक्षेत्रावरील कामासाठी आवश्यक निविष्ठांचा पुरवठा संबंधीत कार्यालयामार्फत केला जाईल.पुरविण्यात आलेल्या निविष्ठा कार्यालयीन वेळ संपल्यानंतर दररोज संबंधीतांकडे जमा करावयाचे आहे. औजारे नादुरूस्त झाल्यास दुरूस्तीसाठी होणारा खर्च ठेकेदाराच्या देयकामधून वसूल केला जाईल.
- प्रक्षेत्रावर दिलेल्या सुचनेनुसार करावयाची कामे विभागाच्या सोयी व गरजेनुसार ठेकेदाराने करणे बंधनकारक असेल, सुचनांचा अवमान केल्यास ठेका त्वरीत बंद केला जाईल आणि त्याबाबत ठेकेदाराच्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.
- ठेकेदाराने पॅनकार्ड व बॅंक खाते असणे बंधनकारक आहे. ठेकेदाराच्या देयकाची अदायगी त्याचे बॅंक खाती एन.ई.एफ.टी./आर.टि.जी.एस. धनाकर्षाव्दारे करण्यात येईल.
- ठेकेदाराने कामावर ठेवलेल्या कामगारांना अपघात/सर्पदंश/विंचूदंश झाल्या संबंधीत कामगारावर योग्य ते उपचार करण्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील. त्यासाठी आलेल्या खर्चाची अदायगी या कार्यालयाव्दारे करण्यात येणार नाही.
- कामाच्या कालावधीत ठेकोदार अथवा त्याच्या कामगाराकडुन/मजूरांकडुन प्रक्षेत्राच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास ठेकेदाराच्या देयकामधून संबंधीत नुकसानीची किंमत वसूल करण्यात येईल आणि त्याबाबत ठेकेदारावर कायदेशिर कार्यवाही करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना असेल.

➢ ठेकेदारामार्फत पुरविण्यात आलेल्या सेवा सुविधा तसेच त्यांच्या कार्यपध्दतीचा आढावा कार्यालयामार्फत वळोवेळी घेण्यात येईल . कार्यालयाने दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे ठेकेदारास बंधनकारक आहे . तसे न केल्यास ठेकेदारास देण्यात आलेल्या ठेका कोणत्याही वेळी रद्द करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे .

➢ सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचिका क्र एस . एस . पी . ५४५३/१० नुसार ठेकेदाराने नेमलेल्या मजूरास/इसमास ठेका कालावधीमध्ये/ठेका कालावधी नंतर विद्यापीठ/शासकिय सेवेत कायम स्वरूपी नोकरी मिळण्यास अधिकर राहनार नाही .

➢ ज्या कंपनीस /संस्थेस/व्यक्तीस ठेका देण्यात येईल त्यांनी उपरोक्त अटि व शर्ती मान्य असलेबाबत करार लिखित स्वरूपात करणे बंधनकारक राहील . कंपनी /संस्थेसतर्फे/ठेकेदारामार्फत कामावर ठेवलेल्या कर्मचा-याच्या ठेवलेले कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठावर असणार नाही .

➢ मजूरांना रक्कम रूपये ४०९ /-प्रति दिन /प्रति मजूर नुसार किमान वेतन अदा करणे बंधनकारक आहे .

➢ मजूरांचे हिताच्या दृष्टीने ठेकेदाराने पुरविलेल्या मजूरांचा पोष्ट कार्यालयाकडून काढलेला विमा असणे बंधनकारक आहे .

## कामाचे स्वरूप

| गट क . | कामाचा तपशिल | एकुण क्षेत्र हेक्टर |
|---|---|---|
| ०१ | १ . काजू लागवडीतील झाडांच्या वुंध्याजवळची आणि झाडाच्या विस्ताराखालील ग्लिरीसीडीया गवत,दिंडा, कुडा, लाजरी, करवंद सारखी सर्व काटेरी झुडपे, जमिनी लगत तोडून, तोडलेला कुजण्यायोग्य पाला पाचोळा गोळा करने, गोळा केलेला कुजण्यायोग्य पालापाचोळा सरळ ओळींमध्ये चेपून वेड तयार करणे .<br>२ . मेलेली काजू झाडे वुंध्यासकट काढून गट रचणे .<br>३ . जळाऊ लाकूड तोडून, गोळा करून त्याचे ब्रास सारखे चौकोनी गट रचून ठेवणे . | २१ . ५० हेक्टर (एकूण झाडे २१५०) |

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली

प्रत, माहितीसाठी व प्रसिध्दीसाठी......

१ . नोटिस बोर्डवर लावण्यासाठी

२ . ग्रामपंचायत कार्यालय सडवे, शिवाजी नगर, असोंड, साखळोली, रुखी, गावतळे.

३ . मा . व्यवस्थापक, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, डॉ . बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

२/यांना विनंती करण्यात येते की, सदरच्या जहिरातीस विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात यावी

४९१

जा.क्र.मसंके/रूवि/दरपत्रक/ / /२०२३
रूखी विभाग,
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली
दिनांक : 09 NOV 2023

प्रति,

मा. व्यवस्थापक,
कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष,
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

**विषय : दरपत्रक नोटीस प्रसिध्द करणेबाबत...**

महोदय,

वरील विषयानुसार सोबत जोडलेली रूखी विभागामध्ये काजू बागांची साफसफाई करणे या कामाच्या दरपत्रकाची नोटीस विद्यापीठ संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

संचालक,
O/C मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली